## नियमीत दिवाणी मुकदमा क्रमांक ५०/२०२२ मधील
## निशाण २० वरील आदेश

१. दावा मिळकतीची व दावा मिळकतीची म्हणजेच गट क्र.४९९ व गट क्र.५०० या लागून मिळकतींच्या हद्द निश्चित होऊन दावा मिळकतीमधील अतिक्रमणाचे व कुंपणाच्या बांधकामाचे स्थलनिर्देशन करुन अहवाल दाखल करणेकामी उप-अधीक्षक, भूमि अभिलेख, लांजा यांची न्यायालयीन आयुक्त म्हणून नियुक्ती होण्यासाठी व सदर मोजणी होईपर्यंत करणेत आलेले ताकिदीचे आदेश कायम करणेत यावेत यासाठी वादी यांनी प्रस्तूत अर्ज दाखल केलेला आहे.

२. वादीचे कथनानुसार सदर दावा हा अतिक्रमण करुन वाद मिळकतीमध्ये बांधकाम करु नये अशा निरंतरची ताकिदीसाठी, अतिक्रमण करुन केलेले बांधकाम स्वखर्चाने काढून टाकणेबाबतच्या आज्ञार्थी ताकिदीचे आदेश करणेकरीता तसेच वादीच्या कब्जे वहिवाटीस हरकत अडथळा करु नये म्हणून निरंतर ताकिदीचे आदेश करण्यासाठी दाखल केलेला आहे. सदर वादाचे मुख्य कारण हे दोन मिळकतीच्या हद्दीबाबत असलेला वाद आहे. म्हणून सदरची हद्द निश्चीती झाल्यास वस्तूस्थीती कोर्टासमोर येणारी आहे. सदर हद्द निश्चीत होईपर्यंत न्यायालयाने केलेली ताकिदीचे आदेश कायम करणेत यावेत.

३. त्याच अर्जावर म्हणणे देऊन प्रतिवादीने कथन केले की, प्रतिवादीने केलेले बांधकाम प्रतिवादीच्याच मिळकतीमध्ये आहे म्हणून फक्त मोजणी मागता येणार नाही. तसेच अगर अशी मोजणी हद्द निश्चीतीसाठी करावयाची असल्यास गट क्र. ४९९ व ५०० यांच्या निश्चीत हद्दी कोठे आहेत व प्रतिवादी यांचे बांधकाम/कंपाउंड कोणते ठीकाणी आहेत याबाबत स्पष्ठ उल्लेख मोजणी नकाशात होणेकरीता कोर्ट कमिशनर यांना निर्देश देणेत यावेत.

४. अभिलेखातील कागदपत्रे पाहिली. वादी व प्रतिवादी यांचे सुविद्य वकिलांचा युक्तीवाद ऐकला.

५. वादपत्राचे अवलोकन करता सदर दावा हा अतिक्रमण करुन वाद मिळकतीमध्ये बांधकाम करु नये अशा निरंतरची ताकिदीसाठी, अतिक्रमण करुन केलेले बांधकाम स्वखर्चाने काढून टाकणेबाबतच्या आज्ञार्थी ताकिदीचे आदेश करणेकरीता तसेच वादीच्या कब्जे वहिवाटीस हरकत अडथळा करु नये म्हणून निरंतर ताकिदीचे आदेश करण्यासाठी दाखल केलेला आहे असे दिसून येते. तसेच प्रतिवादी यांच्या म्हणण्या प्रमाणे प्रतिवादीने केलेले बांधकाम प्रतिवादीच्याच मिळकतीमध्ये आहे.

६. कायदयाचे स्थापित तत्वानुसार ज्यावेळी अतिक्रमणाबाबत तक्रार असेल त्यावेळी दावा मिळकतीची हद्द निश्चित करुन दोन मिळकतींमधील विभाजन करणारी हद्द निश्चित करणे व अतिक्रमण झाले असल्यास त्याचे स्थान व क्षेत्र निश्चित करणे आवश्यक

असते. तोंडी पुराव्याच्या आधारे मिळकतीच्या हद्दी व अतिक्रमणाचे स्थान व क्षेत्र अभिलेखावर सिध्द होऊ शकत नाही. प्रस्तूत दावा अतिक्रमण काढून मिळण्यासाठी आदेशात्मक ताकीदीचा असल्याने तज्ज्ञ व्यक्तीची नियुक्ती करुन दावा मिळकतीची हद्द निश्चित करणे तसेच दोन मिळकतींमधील मिळकतींचे विभाजन करणारी हद्द निश्चित करुन अतिक्रमण झाले असल्यास कथित अतिक्रमणाचे स्थान व क्षेत्र निश्चित करणे आवश्यक आहे.

७. या प्रकरणी उभय पक्षकारांमध्ये हद्दींवरुन वाद असल्याचे दिसून येत असल्याने उप-अधीक्षक, भूमि अभिलेख, लांजा यांची न्यायालयीन आयुक्त म्हणून नियुक्ती होणे आवश्यक आहे. तसेच सदर मोजणी होईपर्यंत ताकिदीचे आदेश कायम का करणेत यावे याबाबत वादी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण त्यांच्या अर्जात नमुद केलेले नाही म्हणून सदरची विनंती फेटाळण्यात येत आहे. सबब मी खालील प्रमाणे आदेश करीत आहे:-

## <u>आ दे श</u>

१. वादी यांचा निशाण २० येथील अर्ज मंजूर करणेत येत आहे.

२. उप-अधीक्षक, भूमि अभिलेख, लांजा यांची न्यायालयीन आयुक्त म्हणून नियुक्ती करणेत येत आहे.

३. न्यायालयीन आयुक्त यांनी उभय पक्षकारांना विहित मुदतीच्या नोटीसा देऊन दावा मिळकतीला प्रत्यक्ष भेट देऊन उपलब्ध शासन अभिलेखाचे आधारे दावा मिळकत गट नं.४९९ तसेच प्रतिवादी यांच्या मालकीची क.ग.नं.५०० या दोन्ही मिळकतींची संयुक्त मोजणी करुन दोन्ही मिळकतींच्या हद्दी निश्चित कराव्यात तसेच दोन्ही मिळकतींची विभाजन करणारी निश्चित हद्द दर्शवावी. त्यानंतर दावा मिळकतीमध्ये अतिक्रमण झाले असल्यास अतिक्रमणाचे स्थान व निश्चित क्षेत्र दर्शवावे. तसेच वादादीत बांधकाम/कंपाउंड हे निश्चीत गट क्र.४९९ किंवा गट क्र.५०० मध्ये आहे याबाबत स्पष्ठ उल्लेख मोजणी नकाशात करणेत यावा.

४. वरील निर्देशानुसार या आदेशापासून तीन महिन्यांचे आत न्यायालयीन आयुक्त यांनी त्यांचा अहवाल नकाशासह दाखल करावा.

५. वादी व प्रतिवादी यांनी आपापल्या मिळकतीच्या मोजणीसाठी न्यायालयीन आयुक्त यांची विहित फि कार्यालयात अदा करावी व तशी पुर्तता केल्याबाबत पुढील तारखेस पावतीची छायांकित प्रत या कामी दाखल करावी.

७. या नुसार कमिशन रिट जारी करण्यात यावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by PRATHAMESH RAMESH BHOSALE
Date: 2022.12.14 09:04:39 +0530

दिनांक ०२/१२/२०२२
**ठिकाण लांजा.**

**(प्र.र.भोसले)**
**दिवाणी न्यायाधीश क.स्तर.लांजा,**
**जि.रत्नागिरी.**

***Certificate***

*I affirm that the contents of this pdf file Order are same words as per original Order,*

| | |
|---|---|
| *Case No :* | *RCS No 50 of 2022* |
| *Name of the Stenographer:* | *I/c P.R.Jadhav, Jr.Clerk* |
| *Court Name:* | *Civil & Criminal Court, Lanja, Dist.Ratnagiri,* |
| *Date of decision :* | *02/12/2022.* |
| *Order/Judgment signed by P.O.on:* | *02/12/2022.* |
| *Order/Judgment uploaded on :* | *02/12/2022.* |